मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
११५५८

म.ग्रं.सं. वाचनालय, ठाणे
विषय नाटक
दा. क्र. ११७७८

IRBK-0111778
IRBK-0111778

दा.क्र. ११७७८

# ग्रा म ल क्ष्मी

डॉ. सरोजिनी बाबर



IRBK-0111778

चिरंजीव ग्रंथ प्रकाशन, टिळक-रस्ता, पुणे ९.

प्रकाशक :

सु. दे. जोशी व म. द. लोखंडे,
चिरंजीव ग्रंथ प्रकाशन,
टिळक रस्ता, पुणे २.

卐 卐 卐

किंमत रु. १·५०

मुखपृष्ठ व आतील सजावट
श्री. एन्. जी. जोशी आर्टिस्ट

प्रथमावृत्ती :
१५ ऑगस्ट १९६६
स्वातंत्र्य-दिन.

© प्रकाशकाधीन

卐 卐 卐

मुद्रक :

शां. दे. जोशी व वि. द. लोखंडे,
प्रतिभा मुद्रणालय,
टिळक रस्ता, पुणे २.

# प्रास्ताविक

खेड्यातील बाई म्हटली, की तिला फारसं वळण नाही आणि ती अडाणी असते, असाच समज शिकलेल्या माणसात रूढ झालेला दिसून येतो. पण मला या बायकांच्यामधून फिरताना अनुभव आला तो अगदी वेगळा असा.

माझ्या लहानपणापासून मी एक बघितलंय, की लग्न होऊन खेड्यातील घरात नवीन सून आली म्हणजे तिला लक्ष्मीचा मान दिला जातो. तिच्या सुख-दुःखावर त्या घराचं सुख-दुःख अवलंबून आहे असं मानलं जातं. म्हणून ती देखील त्याच तोलामोलानं त्या घराचं नशीब काढायला बघत असते. पण काय होतं, की आपली कर्तबगारी दाखवायला तिला नेहमीच संधी मिळते असे नाही. घरात वडिलधारी असतात. त्यातून ही लहान. म्हणून तिचं सारं वागणं, बोलणं नवेपणातच मोडतं. शिवाय ती सासुरवाशीण म्हणून कधी भलेपणात तर कधी ' चालायचंच, लहान आहे अजून ' अशा कवतिकात तिच्याबद्दलची भाषा होत रहाते. तिनं केलेल्या एखाद्या जिन्नसाखेरीज तिचा असा फार करून बोलबोला होतच नाही. म्हणून घरात येणाजाणारांच्या लक्षात ती यायची म्हणजे फार वेळ जातो. आणि जनलोकांच्या माहितीत ती दिसायची म्हणजे तर लांबचीच गोष्ट होऊन बसते.

तर अशा ग्रामलक्ष्मीला उजेडात [illegible]वी असं माझ्या मनानं फार दिवसांपूर्वीपासून घेतलेलं. संधी मिळाली, [illegible]ा अंगातील अनेक गोष्टींची ओळखपाळख जगाला होईल ही त्यामागची कल्पना. म्हणून तिच्याएकी अनेक प्रसंगानं मी इथं बोलणं केलं आहे. वेगवेगळ्या कारणांच्या निमित्तानं ती कशी उठून दिसली, ते दाखवायचा प्रयत्न केला आहे. त्यामुळं ही ग्रामलक्ष्मी सोळा पाकळ्यांच्या तेवत्या समईप्रमाणं तेजस्वी दिसते आहे. कमळाच्या फुला-प्रमाणं तिच्या अंगचे गुण प्रकट झाले आहेत. त्यामुळं वाचकांना ती खात्रीनं पसंत पडेल अशी अपेक्षा आहे. एवढंच नव्हे, तर तिच्याबद्दल आता वेगळं बोललं पाहिजे असंही प्रत्येकाच्या लक्षात येणार आहे.

१५ ऑगस्ट १९६६ — सरोजिनी बाबर

## अनुक्रम


| | |
|---|---|
| १. ग्रामलक्ष्मी | ५ |
| २. पंढरीचे राऊळ | १३ |
| ३. चंदेरी कंगण्या | १६ |
| ४. अनुसयाचे पत्र | २२ |
| ५. नावातील गंमत | २७ |
| ६. कारभारी | ३१ |
| ७. पावती | ३७ |

# १. ग्रामलक्ष्मी

तशी ती वेळ तिसऱ्या प्रहराची होती. त्यामुळे माथ्यावर तळ-पणारे ऊन आता बरेच थंडावले होते. माणसांची 'हाशहुश्श' निवली होती. वारा सुटला होता. तहान मंदावली होती. फाटक्या हातांच्या झाडांतून वाहणारा वारा शांत होता. पिकली पाने सडा घालीत होती. नदीकाठची लाल माती गुलाल फेकीत होती. देवळातील घंटा नाचू पहात होती. आणि त्या धांदलीत कृष्णा नदीला हसू लोटले होते. कारण कधी नव्हे ती एक अपूर्वाई तिच्या नजरेस येत होती. घडलेच नाही कधी ते घडत असल्याचा साक्षात्कार तिला होत होता. आणि म्हणूनच आपल्या साडीचा पदर दातात धरून ती आपले हसू दाबीत समोर पहात होती. तिच्या शेजारच्या एका टेकडीवर बायकामाणसांची सभा बसली होती! बापजन्मी असले काही तिने कधी बघितलेच नव्हते. म्हणून तिला अचंबा वाटत होता. आश्चर्याने ती वेडी झाली होती. आणि म्हणून जो भेटेल त्याला ती विचारू पहात होती, "आज इथं आहे तरी काय मी म्हणते? इंद्रसभा-चंद्रसभा बसलेल्या मी पाहिल्या आहेत. पण

बायका-माणसांची सभा कशाला भरली आहे ? काय बरं कारण निघालं असावं ? सांगेल का कोणी ?"

पण तिला पाहिजे होते ते उत्तर लवकर मिळत नव्हते. कारण ते देण्याची ताकत अजून तिला सामोरी येत नव्हती. रोजच्या रोज तिच्या कुशीत बसून धुणे धुणाऱ्या आणि पाणी भरणाऱ्या बायका तिला बघून नुसत्या गालातल्या गालात हसत सुटल्या होत्या. आणि काय व कसे बोलावे हे त्यांचे त्यांनाच कळत नव्हते ! तर मग बोलावे कुणी आणि कसे ? नाही का ?

तर तेवढ्यात काय गंमत झाली की, मी त्या बायकांच्या सभेत गेले. घोळ्या-मेळ्याने तिथे बसले. पोरीबाळींनी स्वागतगीत म्हटले. आणि आता मी पाव्हणी, म्हणून माझे कोणीतरी स्वागत करणार ह्या अपेक्षेने सभोवार पाहिले. बघते तर एवढा वेळ अगदी खेळीमेळीने बसलेल्या बायका अंग चोरून दाटीवाटीने एकमेकींना खेटून बसलेल्या ! त्यांचे चेहरे घाबरून गेलेले, मने कालवंडून गेलेली आणि छाती दडपून गेलेली ! कोणी बोलायलाही तयार नाही की हलायलाही उत्सुक नाही. आता काय करावे ? मला पण बाई कसे भुलल्यागतच झाले.

म्हणून मी माझ्याशेजारी स्वागताध्यक्ष या नात्याने बसलेल्या बाईंनी ' बोला तुम्ही ' असे मान हलवीत नजरेनेच खुणावले. त्या बाई आणखीनच आकसून गेल्या. त्यांचा चेहरा पांढराफटक् झाला. तरीपण त्या हळूच उठल्या नि मला हात जोडून बोलल्या कशा, "तुमीच बोला. सभा स्वीकारावी हीं." बस्स. त्या बाई एवढेच बोलल्या आणि त्यांनी दहापंधरा मिनिटे चालणाऱ्या स्वागताध्यक्षांच्या भाषणाची अशी थोडक्यात बोळवण केली.

पण तेवढ्याने मला केवढी तरी हुषारी आली. सभा स्वीकारावी अशी विनंती करून ह्या बाईने अध्यक्षपदासाठी माझे

नाव किती खुबीने सुचवले म्हणून सांगावे ! छे ! मला तर नसते बाई हे जमले. एवढ्या थोडक्यात न् इतक्या वेचक शब्दात ही भाषा हीच बाई करू जाणे. इतरांचे हे कामच नाही मी म्हणते.



त्यामुळे मग मी अध्यक्षांच्या खुर्चीवर बसले. दूरध्वनिक्षेपक यंत्र पुढ्यात येऊन उभे राहिले नि मग क्षणार्धात एका पोरगेल्याशा

बाईने लाजत-मुरकत न् भीतभीत हातात एक कागद धरून तो वाचायला सुरवात केली–

"आम्ही महिला मंडळ काढलं आहे. दोन वर्षं झाली. पाच-पंचवीसजणी सभासद. शिवण शिकतो. खेळगाणी करतो. लिहायला-वाचायला शिकवतो. सभा बसवतो. रांगोळ्या काढतो. तरी पाव-ण्यांनी आम्हांला चार गोष्टी ज्ञानामृत पाजावं."

झाले, अहवाल वाचला गेला. माहिती सांगण्यात आली आणि माझ्या कानात निरोप आला की, "विकास-योजनेतून हे महिला मंडळ निघाले आहे. गावच्याच बायका पुढाकार घेऊन ते चालवीत आहेत."

हे ऐकून मला बरे वाटले. म्हणाले, हरकत नाही. एवढ्याशा लहान खेड्यात असाच उपक्रम सुरवातीला घडून यायचा. तर तो वाढीला कसा लावता येईल त्याची मी त्यांना थोडक्यात माहिती दिली. महिला-संघटनेबद्दल त्यांच्याशी बोलणी केली. आणिक त्या कामी यश यावे म्हणून पुढे काही सूचना करणार, तर त्या माझ्या शेजारच्या बाई माझ्या कानाशी कुजबुजल्या, "कृष्णामाईची वटी भरूया. ती दील आशीर्वाद." मला ही कल्पना एकदम पसंत पडली. माझे भाषण मग तिथेच सोडून आम्ही सभेतून चारपाचजणी उठलो. नदीवर गेलो. नदीची खणानारळाने ओटी भरली आणि आशीर्वाद दे म्हटले. कुठून तरी आवाज आला, "आता प्रकाश येऊ दे,...." "मनातली गोष्ट पुरी होईल." म्हणून मी इकडेतिकडे वळून पाहिले. कोण बोलले असावे याचा अंदाज घेतला. पण कुठे कोणी दिसलेच नाही. मला कुणाच्या तरी बोलण्याचा भास झाला असावा. म्हणून ती समजूत उराशी बाळगूनच मग आम्ही तिथे काही एक न बोलता परत त्या सभेत येऊन बसलो.

त्या वेळी पश्चिमेकडे लालजर्द झालेला सूर्यदेव मावळत होता. झाडाझुडातून फिरत जगाचा निरोप घेत होता. आणि आमच्या पुढ्यात पाचसात समया पेटविल्या जात होत्या. वाढत्या वयाचा आकार धारण करीत त्यांनी माझ्यासमोर येणे केले होते. समयांच्या त्या सुंदर प्रकाशात सारी सभा उठून दिसत होती. बायकांचे चेहरे आता उजळू पाहात होते आणि एकमेकीत आवाज घुमत होता, " पैली समई पात्रणी हातात धरू दे. मग आपून तिच्यावरनं बाकीच्या पेटवू या. " आणि त्याप्रमाणे घडतही होते. एकामागून एक समई आपल्या सोळा पाकळ्या खुलवीत सभेतून फिरत होती. ज्ञानाचे जणू वाटप चालले होते. एकीकडून दुसरीकडे असे त्यांचे दळणवळण वाढत होते. खेड्यातील आशिक्षित भागिनींच्या मेळाव्यात आजच्या नव्या युगाचा प्रवेश होत होता. बाईमाणूस शिकायला निघाली होती. स्वतंत्रपणे काहीतरी करून दाखवायची उमेद तिच्या अंगी शिरू पहात होती.

त्याच वेळी एक भला दांडगा फळा कुणीतरी आणून सभेच्या एका कोपऱ्यात ठेवला. त्यावर बरेचसे काही लिहिलेले दिसत होते. आणि समयांच्या उजेडात आता त्या लेखनाचे ह्या बायका थोडेफार वाचनही करू पाहात होत्या ! . . मला ह्या कल्पनेनेच एवढी भारून टाकली की, लिहिणाराचा हात गोरा राजबिंडा असे बोलून दाखविणाऱ्या ह्या साध्या बायका आता त्याच ऐश्वर्याचे डाग आपल्या अंगावर चढवू पहात होत्या ! कामाधामाचे कागद वाचताना आता त्यांच्या कानीचे झुबे नि नाकींची नथ बोलणार होती ! पांढऱ्या वावरात काळं बी पेरून त्या आता आपला चतुरपणा जगासमोर मांडणार होत्या. लिहिण्यावाचण्याच्या सरावाने मिळणारे सुख अनुभविण्याची ईर्षा त्यांच्या मनात खेळत होती आणि त्यासाठी मराठीमाय त्यांच्या पायाशी लोळण घेऊ पहात होती ...

त्या कारणाने, "बायकांनू आपुन किती केलं तरी अडानी मानसं. आपुन काय करावी सबा? ज्येचं त्येला असलं काम शोब्बा देतं. पण त्ये आलं आमच्या दारी चालून. घेतलं हातात. घोळविलं मनात. बोलाचाली केली कानात. आनिक आज उजीवलं जन-लोकांच्या घोळक्यात. असं तसं केलं. चुकलं माकलं संबाळून घ्यावं मी म्हनते. सव्व्या लोकांचं आभार मानावेत किती. माजी न्हाई बाई चालत मती. मी स्वत्तालाच म्हनते की, तू खुळी किती. तरीपन झालं तेच झालं अती. शानपणाचं लेणं लेती. चौगावांनी वाटा फुलल्या. बायका आल्या. पावने आले. सबा बसली. गावाची किंमत वाढली. महिला मंडळाने हिकमत काढली. विकास योजना हारखून गेली. पुरं तर. नमस्ते." असली भाषा करून सभेची अखेरी साधणारी एक पोक्त बाई लाजली. खजील झाली. भुलली. हडबडली. आणिक मला एक जोराचा चिमटा काढीत म्हणाली, "भरलं का पोट पावने? साऱ्या अंगाला चिप्प घाम फुटलाय."

त्या वेळी मी हसले. मनातून कौतुकले. म्हणाले, "महा-राष्ट्राचं भाग्य उदयाला येणार. विकास-युगातील असली ग्रामलक्ष्मी आता पुढं येणार. आपले विचार सांगणार. आणि एकदम कसल्या-तरी नव्या कल्पनांनी हा मराठी मुलूख भारून जाणार. गावच्या विकासाबरोबर माणसांची मनं फुलणार. माणूस शहाणा होणार. नव्या-जुन्यांची देवघेव चालणार." खरंच, मला या कल्पनेने भारी समाधान वाटले. आनंदाने ऊर भरून आला.

त्या घटकेला आणखी एक आठवण मग मनात घोळली गेली. अशीच मी एका खेड्यात गेले होते. तिथे देखील अशाच बायका जमल्या होत्या. महिला-मंडळात त्यांची ऊठबस झाली होती. आणिक सांगायचे म्हणजे त्यांनी स्वतः असली सभा चालवून

दाखविली होती. त्यांच्यापैकीच अध्यक्ष न् सेक्रेटरी झाल्या होत्या. कुणी कुणी नाकातल्या नथी डाव्या हाताने धरून सुंदर सुंदर भाषणे केली होती. खेळांच्या चढाओढी ठेवल्या होत्या. उखाण्यांच्या स्पर्धा लावल्या होत्या. बक्षिसे मिळविली होती. आणि आपणही काही करून दाखवू शकतो, हा उल्हास पदरी बाळगला होता. शेतीच्या न् घरच्या कामात वाकबगार झालेल्या त्यांच्या मनाने या नव्या जगालाही जिंकायची ईर्षा जवळ ठेवली होती.

आणि त्याच गोष्टीचा इतरत्रही फैलाव होत असल्याची आनंदाची दुनिया प्रत्यक्षात माझ्यासमोर उभी राहिली होती. बारा न् बारा चोवीस तास घरकामात व आपल्या मर्यादित कुटुं-बात गुरफटून गेलेली ही ग्रामलक्ष्मी आता बाहेरच्या सामाजिक जीवनात प्रवेश करू शकत होती, ही घटनाच मुळी कौतुकास्पद होती. कारण हे जग आपले नव्हेच, या खुळ्या भावनेने वावर-णाऱ्या बायका आता त्याच जगात प्रवेश करीत होत्या; आणि त्यांना मागासलेल्या म्हणून समजणारांशी स्पर्धा करू पहात होत्या! त्यामुळे ग्रामीण जीवनातील एक नवे विश्व उभारले जात होते. स्त्री-जीवनाच्या कर्तृत्वाला नवे क्षेत्र खुले होत होते. फार काय, सारवणाच्या रेघोट्यातून पत्रलेखनाची हौस भागविणारी बाई आता प्रत्यक्षच पत्र लिहू शकत होती. हा अद्‌भुत चमत्कार अनु-भविण्याचे भाग्य तिला लाभत होते.

संधी मिळाली तर वाटेल ते करून दाखविण्याची ईर्षा तिला सामोरी येऊ पहात होती! शहरातील स्त्रियांनी शिकण्या-सारख्या गोष्टी तिच्या हातून घडून जात होत्या. निर्मळ भाव-नेने हाती येणारे काम ती पार पाडीत होती. त्यासाठी कष्टांची खाण उघडली तर ती भीत नव्हती किंवा कर्तृत्वाचे आव्हान



४३०५

स्वीकारावे लागले तरी डरत नव्हती. तिच्या मनी आत्मविश्वास डोकावत होता. स्वाभिमानाने तिचे प्रत्येक पाऊल पडत होते.

त्यामुळे तिच्या कौतुकाने कृष्णामाई भारावली होती. रस्ते सुखावले होते. वारावावटळ नाचत होती. चांदण्या खुलत होत्या. आणि बायकांची सभा गावात बसली या कल्पनेनेच खुळेभैरे झालेले गावकरी तोंडात बोट घालून घडल्या गोष्टीची वाखाणणी करीत होते.

• • •

## २. पंढरीचे राऊळ

खरं म्हणजे पंढरीला जाणं यंदा मला जमणार नव्हतं. घरात पावण्यारावळ्यांची दाटी झालेली. नातवाचं बारसं निघालेलं. मोत्यापवळ्यांनी पाळणा गुंफायचा होता. रेशमाच्या दोऱ्या वळायच्या होत्या. हिऱ्यामाणकांचा चांदवा फुलवायचा होता. म्हणून मी आपली माझ्याच नादात हं ! तर काय झालं की, तेवढ्यात मला एकामागनं एक अशा दोन चिठ्ठ्या आल्या. अगबाई ! म्हटलं हे काय ? लेक घरात. पावणा सोप्यात. चिठ्ठी कोणाची ? ' भाऊराया खुशाल हाय नव्हं ? ' माझा जीव उडून गेला. पण बघतीया तर काय ? माझ्या पांडुरंगाच्या चिठ्ठ्या निघाल्या. आता बरं हाय का ? नव्हं पांडुरंगानं बोलीवल्यावर नाही कसं म्हणणार ? सगळ्या कामाची मोट बांधली. ठेवली जावेच्या हातात न् म्हटलं बघ बाई. भराभरा बारसं उरकलं. साता नवसाचा नातू पाळण्यात घातला. श्रीरंग नाव ठेवलं न् लागले पंढरीच्या वाटेला. करू काय मग ?

पंढरीची वाट. माझ्या जिवाचा थाट. पाय रंगलं शाडूमातीनं. घडुतं भिजली पावसानं. दिंडी आली सामोरी. ज्ञानोबा-

तुकोबाची झाली बरोबरी. पोथी लावावी म्हटलं ज्ञानेशरी. मनाला आली उभारी. घेतली तुळशीची माळ. वाट फुटली रानोमाळ. निघाले मग झपाट्यानं. आखाड एकादशीच्या कारणानं. पांडु-रंगाच्या सांगाव्यानं.

पंढरपूर गाव. तिथल्या बारीक पेठा. दिंडीची रेटारेटी. चंद्रभागेची वाळू. हिऱ्यामाणकांचे जसे खडे. साधुसंत नाचतो देवापुढे. माझं मन भाग्यवंताचं. सोन्याच्या तोलाचं. तुळशीच्या मंजुळेचं. मी केला विचार. शिरले चंद्रभागेत. पाणी उसळतेलं. गात्रात शिरतेलं. नाव नवरी झालेली. कावरीबावरी दिसतेली. तिची केली पूजा. चंद्रभागेची भरली वटी. उतार दे म्हणून झाली टाळी. पांडुरंग झाला वनमाळी. आला धावत. केलं आगत-स्वागत. विचाराला आली बरकत. देवाने हात दिला हारकत. नेलं राउळात. गरुडखांबाला घातली मिठी. आयाबाया भेटल्या एकाएकी. विठ्ठलरखुमाईच्या पडल्या गाठीभेटी. झाला आनंद. माहेरानं फुलली पाणंद. मी झाले वेडी. विठ्ठलानं पोटाशी धरली लाडीलाडी. त्या भेटीची काय सांगावी गोडी. रखुमाईनं दिली मला मोत्यांची बुगडी. विठ्ठलनामाच्या गजराच्या बसल्या जिकडंतिकडं चवडी न् मग मी बसले तिथंच एक रात तेवढी.

पुन्हा मग निघाले माघारी. आल्या पावसाच्या सरीवरसरी. माहेर झालं मनोहारी. वाटेनं फुलल्या गणगोतांच्या भेटीच्या झालरी.

रानमाळ तुडवलं, वाट मागं सारली. गावची शीव गाठली. घरात आले. झाली गोष्ट बोलले. चंद्रभागेच्या पाण्यानं घरातले देव न्हाऊ घातले. प्रसाद दिला. कुंकू न् बुक्का आल्या-गेल्याला लावला. पावणारावळा मग आपल्या घरी परतला न् मग माझा जीव खाली पडला. आता कुठं नातवाला मांडीवर

घेऊन बसलेय न् हरिहरी करतेय. काय तर ? सारी धांदल न् सारी गडबडच. जिवाला फुरसत म्हणून नाहीच कसली ती ! तर काय ? माझ्या पांडुरंगानं पंढरीच्या राउळात जी काय शांती दिली तेवढीच. त्या गोष्टीची सर कोण करील काय ? छे ग बाई !



काय सांगू माझ्या विठ्ठलाचं ध्यान ! अठ्ठावीस युगं विटेवरी उभा. शिरी मोत्यांचा मुकूट, भिम्मक राजानं समींदर पालथा घालून मोती जमविलं आबूट. बघून हारलीया तहानभूक. नाही रहात कशाची सूदबूद. विठ्ठलचरणी विसरते मी प्रपंचाचं सुखदुख. म्हणून आखाडीची मला लईच निसती आवड न् धरते मग पंढरीच्या वाटेची सवड.

• • •

## ३. चंदेरी कंगण्या !

छलाट्या अंगलटीच्या आणि उंच काठीच्या बांध्याच्या माळणी फुलांच्या पाट्या डोईवर घेऊन झोकात जाताना त्या दिवशी मी पाहिल्या, तशी माझं भान हरपून गेलं. पंढरीच्या विठु-रायाला फुलांचा पोषाख घालायला त्या निघालेल्या. पण माझ्या मनात आपणच तो पोषाख गुंफावा असं आलं. म्हणून मी माळवदावरच्या गच्चीतून खाली डोकावीत होते, ती तशीच भराभर जिना उतरून खाली रस्त्यावर आले; आणि आता त्या माळणींना हाळी मारणार तर तितक्यात त्या दिसेनाशा झाल्या. खालच्या आळीतून वरल्या आळीला गेल्या. म्हणताना माझा हिरमोड झाला. जड अंतःकरणानं मी माघारी घरात आले. मनात विचार केला. आपल्या घरची फुलं तोडून हे काम करावं म्हटलं.कामाला लागले. मोगऱ्याचीं न् सदाफुलीची वंजळभर फुलं तोडली. सुईदोरा घेतला. तशी बाई अवचित मनी एक विचार आला, " रुक्मिणी आईला हारगजरा करावा का कंगण्या बनवाव्यात ? " ह्या कल्पनेनं जीव हारखून गेला. विठ्ठरायाच्या नावानं चार फुलं बाजूला काढली.

तुळशीच्या मंजिरीत खुपसली. तेथूनच नमस्कार घातला. आणिक बसले कंणग्या घडवीत. रुक्मिणी मातोश्रीला ह्यापेक्षा आणखी काय पाहिजे दुसरं ? सौभाग्याचा चुडा. बस्स !



पण बाई, मनीचा बेत पक्का करताना फुलांची कंगणी घडवायची कशी, असली शंका आली. बांगडीचं माप ? कोणता गाळा ? आता आली का पंचाईत ? नव्हे, मापाविगर बांगडी व्हावीच कशी ? नाही का ? पण देवाचा हात अंगासंगं चिकटलेला नू लई पंचायतीची गरज नाही. गोष्ट खरी. पण शोभा नको दिसायला ? म्हणताना मग बाई, मी आपल्याच बांगडीच्या मापानं कंगणी घडवू लागले. तुळशी मंजिरीला आकार दिला नू त्यावर फुलं चढवून ती शिवीत सुटले. तशी माझ्या मनी पुन्हा विचार आला हं ! शेरभर सोन्याचं एकेक काकण लेणाऱ्या आणि त्या काकणाला साडेतीनशे

मोती जडविलेल्या रुक्मिणी आईला आपली ही ओबडधोबड कंगणी पटावीच कशी? नव्हं, जिच्या बापानं, भिमक्क राजांनी मनाजोगता डाग घडवायला यावा म्हणून तिला सागर आंदण दिलेला न् तो सागर उपडा करून त्यातल्या हिऱ्यामाणकांनी, मोत्या-पोवळ्यांनी जी आपले डाग बनविते, ती रुक्मिणीआई आपल्या कंगण्या बघून हसेल का नाही? नावं ठेवीना तर काय राहील म्हणता काय? अबीर-बुक्क्यांच्या गर्दीकारणानं रुसून पद्मतळ्याला जाऊन बसणारी ही बाई विठूरायाला 'दे माय धरणी ठाय' करून सोडती जनी एकी, तर ती काय आमच्यासारखीचं मानील म्हणता काय? छे ग बाई! उगीच आलं मनात म्हणून काय झालं?

आपल्याच मनाचा असा जरा गोंधळ उडाला म्हणताना मग मी पुन्हा विचार केला. हाती घेतलेलं काम करावं का नाही पुरतं? कोडं पडलं. तितक्यात वाऱ्याची गार झुळूक आली. मोगऱ्याचा सुवास दरवळला. उमलती कळी आणखीनच फाकली न् नक्षत्रांच्या मेळ्यात बसलेल्या चांदणीगत दिसली. म्हणताना धीर आला. तुळशीबनातून आणलेल्या शेलक्या मंजिऱ्या गोळा केल्या. त्यांच्याच कंगण्या गुंफल्यावर मोगऱ्याची फुलं लावली. त्यावर जीगाच्या जरीच्या तारा खेळवल्या न् तयार झालेल्या चंदेरी कंगण्या घेऊन विठूदेवाच्या राउळाकडे निघाले.

पण बाई, राउळाची वाट कशी सापडावी नेमकी? आला का घोळ? पंढरपूर नगरी मला नवी. मी तिला पावणी. तर म्हटलं, खुळं म्हणू नाही कुणी आपल्याला. पण केला मनाचा धीर न् निघाले. आळीमागून आळी मागं पडत चालली. एकच खूणगाठ मनात धरलेली हं! ज्या घराच्या अंगणात अबीर-बुक्कयाची, हळदीकुंकवाची न् शिरगोळ्याच्या पिठाची रांगोळी असेल, ते घर विठूदेवाचं. झालं, तेवढ्या एका आधारावर निघाले. कुणाला म्हणून

कुणाला विचारायचंच नाही म्हटलं. मग काही का होईना. माझ्या हातातील कंगण्यांना कुणाची दृष्ट झाली म्हणजे मग? त्यापेक्षा आपणांलाच काय तसदी पडेल ती पडू दे, या विचारानं मी थेट माझ्या खुणेवरून विठूदेवाच्या राउळात गेले. नामदेवाची पायरी चढले. गरुडखांबाला टेकले. विठूदेवाला दंडवत घातला. भजनकीर्तन चाललंवतं ते ऐकलं. आणि मग विठूदेवाच्या चरणी ती फुलं अर्पण करून पाठीमागच्या रुक्मिणीआईच्या मूर्तीजवळ आले. बघतेय तर काय तिचा साज–शिंगणार? लफ्फेदार बुट्टयांच्या पदराचा शालू नेसलेली, अंगावर हिऱ्या–माणकांचे, मोत्या–पोवळयांचे डाग ल्यालेली. नाकात सर्ज्याची नथ. गळयात चिंचपेटी, कानात अग्गर-बाळ्या न् बग्गरबाळ्या. दंडावर बाजूबंद. हातात गोठ-पाटल्या न् तोडे. पायात भारूभार पैंजण आणि शिंदेशाही तोडे. म्हणजे कमतरता अशी कुठं नाहीच. म्हणताना मी धीर केला. रुक्मिणी आईच्या नजरेला नजर दिली. ती हसल्यागत वाटली. म्हणताना मी पण हसले. आणि त्यासरशी पायघोळ जरी पातळ नेसून, गळी चंद्रहार लेवून, भाळी चंद्र रेखून आणि पाचीपक्वान्नांचं भोजन तयार करून आल्यागेल्याची पंगत साजरी करणारी रुक्मिणीआई माझ्या डोळ्यात मावेना. मी बघतच राहिले न् त्या नादात अवचितच त्या चंदेरी कंगण्या तिच्या पायाशी ठेवीत तिला दंडवत घातला. तर सांगायचं म्हणजे एकाएकीच त्या कंगण्या अशा चमकल्या, अशा लकाकल्या, की सारे दागिने त्यांच्यापुढं फिके पडावेत!

ते बघून माझं पोट भरलं. काळीज आनंदानं भरून आलं. आणिक पुन्हा एकडाव त्या मातोश्रीला नमस्कार घालून मी माघारी वळणार तर कोणीतरी बोलून गेलं, 'लेकीबाळं, कवा आलीस?'' म्हणून मी चटाकिनी इकडे तिकडे माझी नजर फिरवली. बघतेय

तर कोणीच दिसेना. तशी पुन्हा आवाज आला, "तुझ्या मनात यंदाला यायचं नव्हतं. पण मी दोन चिठ्ठ्या पाठवल्या. आलीस, आनंद झाला. हरिनामाची गजनी घेऊन चोळी ले. माहेर करून घेऊन मग जा." आणि माझ्या समोरची, पुढ्यातील रुक्मिणीआई पुन्हा हसली. तिनं आपल्या मनानं माझ्या चंदेरी कंगण्या आपल्या हातात चढविल्या आणि माझ्या हातावर शेरभर सोन्याचे तोडे ठेवून मला आशीर्वाद दिला, "आयुक्षवंत हो."

झालं. साऱ्या राउळानं ही वार्ता ऐकली. माणसांची ही झिम्मड उडाली. रुक्मिणीआईच्या चालत्याबोलत्या मूर्तीला नमस्कार घालायला माणसांची रीघ लागली आणि त्या धांदलीत मी बिचारी पार चुरगळून गेले. माझ्या हातावरचे ते शेरभर सोन्याचे तोडे मी रुक्मिणीआईच्या हातावर तसेच ठेवले आणि तिनं दिलेला खडीच्या चोळीचा खण घेऊन कशीबशी राउळातून बाहेर पडले. तशी बाई विठूराया माझ्या मागोमाग आला न् त्यानं मला पोटाशी धरून जनाईची ओळख करून दिली. तिच्या संगं खेळ म्हणाला. त्यानं भर्जरी वस्त्रांचा ढीग आमच्यापुढं करून रुक्मिणीआई रुसलीच तर तिला तेवढं नेऊन दे म्हणाला! मला गळ घातली! तशी आम्ही बघतच राहिलो. म्हणताना विठूदेवानं खुलासा केला, "तुझ्या कारणानं तिचा रुसवा निघाला. आता एवढं कर," आणिक तो राउळात पुन्हा निघून गेला. त्याच्या मागोमाग जनाई गेली. उरले ती मी एकलीच.

त्यामुळं त्या भर्जरी शालूशेल्यांचा ढीग हाताच्या बोटांनी धरत खेचून नेटानंच रुक्मिणीआईला मी ओरडून सांगितलं, "तुझी ही वस्त्रं घेऊन जा. रुसवा सोडून दे. उभ्या जगाचा पालनकर्ता तुझा धनी. ऊठ. नाहीतर माझ्या चंदेरी कंगण्यांची तुला आण आहे!"

आणि मग मी उतरले होते त्या घरी धूम पळत सुटले. रुक्मिणीआईनं ऐकलं नाही आणि ह्या दोघांचं जर भांडण जुंपलं तर काय घ्या! या कल्पनेनंच दडपलेला जीव मुठीत धरून मी आमचं ते घर गाठलं आणि विठूरायानं आपल्यावर रुसूफुगू नये एवढ्यासाठी त्याला पण फुलांचे हार-गजरे गुंफून देईन, म्हणून तुळशीबनाच्या साक्षीनं नवस बोलले. त्याशिवाय उडून गेलेलं मन खालीच बसेना तर काय करू मी मग!

• • •

ग्रंथ संग्रहालय, ठाणे
अनुक्रम ७३०७८
विभाग बालवाङ्मय
क्रमांक ३३९५
नों. दि. ९/९/८०
नालय शाखा

# ४. अनुसयाचे पत्र

"भाऊसाब, कोन तरी एक म्हातारी यिऊन गेली मगाशी. तुमची लई आटवन काढली तिनं. मी बस म्हनालो. पर गावाला जायाचं हाय म्हन गेली गडबडीनं !"

मी फिरून आल्यानंतर आमच्या गड्याने, श्रीपतीने, मला ही बातमी दिली आणि मग माझ्या हातातील कोट उचलून घेतला. मी घरात येऊन बसलो. श्रीपतीने चहाचा कप माझ्या हातात दिला. चहाचा एक घोट घेऊन मी त्याला विचारले, "ही म्हातारी कुठून आली होती ? काही सांगितलं तिनं ?"

"न्हाई बा !"

"मग तू विचारलं नाहीस तिला ?"

"विचारलं की ! पर....थांबा हं !" असे बोलून श्रीपती धावत बाहेर गेला. क्षणभराने त्याने एक कागदाची घडी माझ्या हातात दिली आणि तो म्हणाला, "ह्यांत माजं सारं सारं हाय म्हनलीया ती !"

"असं होय ? आणि कायरे, दिसायला कशी होती ती ?"

कसल्यातरी आठवणीने जिज्ञासा म्हणून मी विचारले. त्यावर मी तो कागद उघडून पाहण्यापूर्वीच तो म्हणाला, "वाइच गोरी हुती म्हनीनासा. नाक-डोळा हुता तरतरीत. दात मातूर पडलंवतं आन् वाइच वाकली व्हती. पर तुमची लई येळा आटवन केली बगा."

कुतूहलाने मी कागदाची घडी उघडली. त्यावर खालीवर नजर टाकली. मोठ्या अक्षरात तेथे मला 'अनुसया' अशी सही आढळली. हे नाव माझ्या ओळखीचे होते. आमच्या घरी सहा वर्षांपूर्वी माझ्या बहिणीला सांभाळायला म्हणून ती होती. एका घटकेत मला सारे आठवले. त्या वेळी अनुसयाची इच्छा नसताना बळेबळेच मी तिला लिहायला व वाचायला शिकविल्याचे ध्यानात आले आणि म्हणून मी विशेष जिज्ञासेने वाचू लागलो. अनुसयाने मला लिहिलेल्या त्या पत्रात लिहिले होते—

"लई दिस झालं न्हाई का गाट पडून? बरं हाई का सारं तुमचं? म्हायारला म्हून गेले पर पुना याला झालंच न्हाई. तुमाला म्हटलीवत्ये तरी म्हईन्याभरानं याची. पर थंडीतापानं शीक झाली मी! मग कची येऊ? त्या यळेस तुमची लई आटवन झाली. तुमी मला शिकवित हुतास तवाचं म्यां माज्या आईला सांगितलं—

पोथी पुस्तक वाचताना भीकबाळीचा मोती हालं

साब कागदासंगं बोलं.

आन् म्हणून मग म्यां तुमी शिकविलं हुतसा त्ये सारं ध्यानात धरलं बरं का! म्हणून तर ह्ये पत्तर लिवतीया.

आमच्या शेतापाशी का न्हाई एक नदी हाय. ततनं माजं आजूळ दिसतं. आन् ततं का न्हाई—



नदीच्या पलीकडे काडी हालती ल्व्हाळ्याची ॥
रावसाबाला किती सांगू ? मामा मावशी जिवाळ्याची ॥
असली मानसं हाईती.

अजूनबी थोरल्या जात्यानं दळान दळती बरं का! चांगलं खस्सासा. पळतं जातं तवावानी. आवं इसरंल कसं त्ये ?

थोरल्या जात्याची ग। म्याग केलीया भिंगरटी ।।
बयाचं पेली दूध। माज्या खेळतं मनगटी ।।

अशी गोष्ट हाय त्येची. आताच्या पोरीस्नी मातूर ह्ये जमत न्हाई. आवं आमच्या बाबूनं न्हाई का काय केलंय ठावं हाय ?

भावानं केल्या सुना लेकापरास देकयीन्या ।।
हाती दवत लेकयीन्या ।।

असली गत हून बसलीय न्हव का !

मदी मी दोनचार डाव पंढरीला बी गेलीव्हती. तवा लई दिसाची मनची गोष्ट झाली बगा. न्हाईतर—

पंडरीला जाया। घाट चडीती दरडीचा ।।
पांडुरंगाच्या बाई माज्या। आला सांगावा पिरतिचा ।।

असं सारकं मनांत राहून गेलं असतं बगा. म्हणून तर जाऊन आली मी.

ताई साव बऱ्या हाई त्या ? त्यास्नी कवा बगीन झालंया. पर आता जातीया म्हमईला लेकीकडं. येताना पुना ईन. लेकीची पोरं हाईती बरी. आमच्या घरला ती आली मजी रामाचं राज आल्यावानी घर भरून जातंया. आनू—

आकाशी वावडी ग चंग लावूनी सोडियीली ।।
तान्या माज्या राजसांनी। नगरी रामाची येडियीली ।।

असं सारं गाव म्हणतंया वं !

तुमची भनीभावांडाची लई सई येती बगा. चांगलं हाईसा ? लई ग्वाड मानसं तुमी अक्षी—

भनी भावांची। पोटात त्येची माया ।।
हिरवं शिताफळ। आंत साकरची काया ।।

आता जात्ये. भेटीन तवा लई लई सांगायचं हाय....

धनीसाब, आवं तुमी भेटला न्हाईसा तर हे पत्तर ठेवावं म्हन लिवलं. पर आठ रोज लागल्याती बरं का ? हाइं नगासा. शप्पत हाई माजी. लिवायला आलंय का वं ?

—अनुसया "

एकदा सोडून दहादा मी ते पत्र वाचले. मला फार आनंद झाला. माझ्या घरात मी हे अनुसयाचे पत्र सर्वांना वाचायला दिले. जो कुणी घरी येईल त्याला सांगितले सुद्धा !

अनुसया माझी इच्छा म्हणून शिकली. पण मी ते आता सारे विसरून गेलो होतो. बरेच दिवस ती भेटली नाही त्यामुळे खरे म्हणजे तिची आठवणही माझ्या मनातून बुजत चालली होती. पण आजच्या तिच्या ह्या पत्राने प्रत्यक्ष तीच मला भेटल्याचा आनंद झाला. एवढ्या लहान पत्रात तिने आपली किती सुंदर माहिती दिली आहे, याचे माझे मलाच नवल वाटले. मी तिला उलट उत्तर लिहिणार होतो पण तिने पत्ता दिला नसल्यामुळे माझा नाइलाज झाला. त्याबद्दल मला सारखी रुखरुख लागून राहिली आहे ... ती भेटेल तेव्हा खरे....तिला ओव्या गायचा नाद होता. ते तिचे वेड या पत्रातूनही मला आढळले. या ओव्या वाचून मला फार आनंद झाला आणि म्हणून ते पत्र माझ्या महत्त्वाच्या कागदपत्रात ठेवीत मी गोविंदाला म्हटले, " पुन्हा ही म्हातारी आली तर मी असेन तिथून मला बोलाव हं !....फार महत्त्वाचं काम आहे तिच्याकडे माझं. विसरू नको हं !...."

● ● ●

# ५. नावातील गंमत

आपण नुकतंच सारवून काढलेलं घर डोळ्यांनी न्याहाळताना राजाई समाधानानं स्वतःशीच असं काही गुणगुणू लागली. मनासारखं घर सारवून झालं, की तिला नेहमीच असा आनंद व्हायचा. त्यात आज तर तिला शिकविणाऱ्या बाई तिच्या घरी यायच्या होत्या ! म्हणून सारं घर लख्ख ठेवण्यासाठी तिची ही धडपड चालली होती.

ठरलेल्या वेळेला राजाईच्या बाई तिच्या घरी आल्या. त्या वेळी राजाई अंगणातच उभी होती. बाईंना पाहताच ती आनंदानं सामोरी गेली. "आले की नाही ?" असं म्हणत बाईही तिच्या स्वागताचा स्वीकार करीत आत आल्या.

चहापाणी झाल्यावर राजाईनं आपल्या बाईंना सारं घर फिरून दाखवलं. बाईंना भारी आनंद झाला. राजाईकडं कौतुकानं पाहात त्या म्हणाल्या, "किती शहाणी आहेस ग !"

राजाई वयानं मोठी झाली होती. तरीपण बाईंचं हे बोलणं ऐकून तिला एखाद्या लहान मुलाप्रमाणे आनंद झाला. तिचा तो आनंद बघून तिच्या बाईच पुन्हा म्हणाल्या, "आता कळलं मला."

" काय वं ? "

" तुझं नावच तुला कशाला यायला हवं ते. खरंच फार शहाणी आहेस तूं. अशा बायका शिकायला लागल्या तर किती बरं होईल ! "



राजाईची लहान मुलं शाळेत जात होती. त्यांना त्यांचं नाव काढायला येत होतं म्हणून ती मुलं नेहमी नेहमी आपल्या वहीवर पेन्सिलीनं, पाटीवर खडूनं, भिंतीवर चिपाडाच्या चुईनं नाहीतर चिंचोके गोळा करून त्या चिंचोक्यानं आपली नावं काढीत किंवा कोरीत होती. राजाईनं हे पाहिलं होतं. म्हणून मोठ्या बायकांना देखील शिकवायची शाळा निघाल्यावर आपण तसंच नाव काढायला शिकायचं असं तिला नेहमी वाटे.

राजाईच्या इच्छेप्रमाणं तिच्या गावात मोठ्या बायकांना शिकवायची शाळा निघाली. राजाईला तिथं जावंच लागलं. त्या वेळी हातात पाटी पडताक्षणीच ती आपल्या बाईंना म्हणाली, "मला आदी नाव याला हवं माजं," त्यावर तिच्या बाई म्हणाल्या, "नावंच कसं? अगोदर ग म यायला नको?" पण राजाईनं आपला हट्ट बिलकूल सोडला नाही. तिनं स्पष्ट आपल्या बाईंना सांगून टाकलं, "न्हाईतर मी न्हाई येणार शिकायला." बाईंचाही मग नाइलाज झाला. मुलांच्या कलाप्रमाणं त्यांना शिकवावं हे बाईंना माहीत होतं. त्यांनी तो प्रयोग इथंही करायला हवा, म्हणून आपल्याच मनाची समजूत घातली आणि राजाईला तिचं नाव शिकवलं.

राजाईला अगदी लौकर आपलं नाव काढायला आलं, म्हणून तिनं आपल्या घरात आपलं नाव काढायचा सपाटा लावला. तिच्या पोरांप्रमाणं पाटी नि पेन्सिल घेऊन बसायला तिला कुठला वेळ मिळायला? म्हणून तिनं फुटलेल्या बांगड्यांच्या काचा गोळा केल्या. आपलं नाव रंगीबेरंगी काचांनी भिंतीत रोवून टाकलं! पुढं मग त्यावरून चांगलं सारवूनही घेतलं.

जमीन करायची म्हणून राजाईनं साऱ्या घरभर उकरून जमीन भुसभुशीत केली. बडवण्यानं जमीन बडवण्यापूर्वी तिनं

मूठभर चिंचोके आणले आणि त्या जमिनीत जिथं तिथं आपलं नाव बसवून दिलं ! एवढंच नव्हे, तर ती सर्व जागा सारवून झाल्यावर त्या सर्व शेणाच्या ज्या गवऱ्या लावल्या, त्या देखील थेट राजाईनं आपल्या नावासारख्याच, अक्षरांना वळण असतं तशा वळणात, थापून टाकल्या !

एकदा अंगणात न्हाणीचं पाणी जिथं पडत होतं, तिथं आळूचा वाफा लावायचं ठरलं, तेव्हा राजाईनं त्याची मांडणी अगदी आपल्या नावासारखीच करून टाकली !....

राजाईची आपल्या नावाची ही सारी धडपड आणि आपल्या कामांतूनच शिकायची भानगड बघून तिच्या बाईंनादेखील तिचं भारी कौतुक वाटलं. 'खेड्यातील अडाणी बायका काय शिकणार?' ही त्यांची समजूत चुकीची ठरली. एवढंच नव्हे तर 'नावात काय आहे?' असं जे आपण नेहमी म्हणतो ते सुद्धा त्यांना चुकीचं वाटून त्या राजाईला म्हणाल्या, "खरंच, नावात देखील खूप गंमत आहे हे तू मला आज पटवून दिलस. आता मी सर्वांना आपलं नावच अगोदर काढायला शिकवीन !"

बाईंच्या या शाबासकीनं राजाईला आनंद झाला. तेव्हा ती बाईंना म्हणाली, "आनिक लई मज्जा करनार हाय नावाची. तवा तुमास्नी दावीनच." आणि मग त्या दोघीही खूप हसल्या.

• • •

3305 ... 3395 ... 9/9/80

# ६. कारभारी

माझ्या लहानपणची गोष्ट. आमच्या घरी आजोबांनी एक गडी ठेवला होता. बाकी दरवर्षी जेऊन खाऊन त्याला शंभर रुपये द्यायचे म्हणूनच त्याला गडी म्हणायचं. एऱ्ही तो आमचा घरचा मालकच होता म्हटलं तरी वावगं नाही.

आणि त्या दृष्टीनच आमच्या आजीनं त्याला 'कारभारी' म्हणायचं असं आम्हां पोरासोरांना बजावलं होतं. हो, त्याचं कारणही तसच होतं नाही तरी. आमच्या घरचा बराचसा कारभार त्याच्याच हातात होता. कुणाला कपडे आणायचे झाले, की तो चटकन् गाडी जुंपायचा की सांगलीच्या वाटेला लागायचा. कुणाला कसले कपडे हवेत याची आवडनिवड त्याची. अगदी बाबांना लागणाऱ्या बंडीपासून तो थेट माझ्या चड्ड्या–बुड्ड्याच्या झग्यापर्यंत त्याचीच पारख! नाही म्हणायला घरातल्या बायकांच्या लुगडं-चोळीत बरीक तेवढं तो गप्प बसायचा. पण एकदा त्या बाबतीतही आजीजवळ त्यानं विषय काढला होता की, तिनं पांढऱ्या चौकटीचं नि हिरव्या खवल्या काठाचं टोपपदरी रेशमी लुगडं

घ्यावं ! ...... मात्र अशा बाबतीत तो अगदी रागरंग ओळखून असायचा, इतरांच्या बाबतीत कारभार त्याच्याच मनचा !



एकदा काय गंमत झाली, की मला आजीकडून साखरेच्या भावल्या खेळायला न् मग खायला हव्या होत्या. माझी समजूत आजी मला मेवेकऱ्याकडं घेऊन जाईल व हवं ते घेऊन देईल. पण आजीनं ह्या कारभाऱ्यावर तो प्रश्न सोपवला आणि

कारभाऱ्यानं शेतातलं काम बाजूला सारून मला लगेच मेवे-कऱ्याकडे नेलं. तिथं गेल्यावर तो मला म्हणाला, "कोंची भावली पाइजे, कोंचं चित्तार पाइजे, कोंची माळ पाइजे बोल!.... म्हनचील ती देतो!" आणि मग मीही लाकडाच्या साच्यात साखरेचा रस ओतून शंभरापर्यंत आकडे मोजेस्तोवर बाहेर येणारा माल बघत 'हे पाहिजे!' 'ते पाहिजे!' असं त्याला सांगून जिभेला पाणी सुटलं होतं ते ओठांच्या आत मुडपीत हावऱ्यासारखी बघू लागले. मला वाटलं एखादी-दुसरी भावली, चारदोन घोडे, नाहीतर पोपट-मैना असली चित्रं तो घेऊन देईल आणि गळ्यात पुतळ्यांची माळ घालून तो 'चल' म्हणून मला चुटकीसरशी उचलून खांद्यावर बसवील!.... पण तसं न करता त्यानं माझ्या झग्याचा ओटा भरेल एवढी चित्रं नि भावल्या घेऊन म्हटलं, "एवढं खाल्लस मंजी पोटात बारा हुईल! ....तवा एकेक रोज ह्या बेतानं खा!.... न्हाईतर वचावचा खाचील... सारी चित्रं हितंच ठेव!" तेव्हा मात्र अधाशीपणानं त्या चित्रांकडे पहात मी त्याचं म्हणणं कबूल केलं आणि हळूच एक चित्र गरमा-गरम असं तोंडात कोंबून म्हटलं, "आजच्या दिवस दोन तीन खाईन हं! ...न्हाई म्हनू नकोस! शप्पत हाय माजी .." त्यामुळं बिचारा गप्प बसून माझ्या हलत्या तोंडाकडे बघून म्हणला, "तुजी मर्जी...पन आजपसनं संगं न्हाई न्याचा कुटं ऐकायचं न्हाई तर!...." आणि एकटा घराकडे निघून गेला देखील!

त्यानंतर त्यानं मला चांगले चार महिने तरी कुठं नेली नाही आणि नवा झगा आणला नाही!.... आजी नि बाबा देखील त्याच्यापुढं काही बोलेनात. उलट मलाच म्हणाले, "तूंच खुळी! का न्हाई ऐकलस कारभाऱ्याचं! आता बस तशीच!..." पण मला गप्प कसं बसवेल? मीही मग ठरवून टाकलं की, त्याच्या-जवळ जाऊन त्याच्या मांडीवर बसायचं आणि त्याच्या गळ्याला

मिठी मारून म्हणायचं, "अशानं आमी मरतो जा!" .... तशी अंमलबजावणीही मी लगेच करून टाकली. तो त्यानं घाबरून मला पोटाशी धरत म्हटलं, "छे, छे! मरू नगस!.... आत्ता काय काय पाइजे त्ये त्ये देतो चल...." माझा अंदाज खरा ठरला. त्याचं एकुलतं एक पोर मेल्यापासून आमच्या घरांतील पोरे मेलेली त्याला खपायची नाही, असं तो शेतावर केव्हातरी, कुणाजवळ तरी बोलल्याचं मला ठाऊक होतं. म्हणूनच तशी त्याला भीती घातल्या-बरोबर त्यानं माझ्यावरचा राग सोडून दिला!....

आणि त्याच दिवशी मग एका त्याच्या जवळच्या नात्या-तल्या माणसाच्या लग्नाला मला त्यानं कोल्हापूरला नेलं. पण गंमत काय झाली, लग्नाचा पत्ता त्यानं बरोबर न घेतल्यानं उगीचच मला खांद्यावर घेऊन तो हिंड हिंड हिंडला नि मग नाकासमोर आलेल्या एका मांडवांत दाबून शिरला! त्याचा परिणाम असा झाला की, तिथलं लग्न लागलं आणि नवऱ्याची जेव्हा त्यानं विचारपूस करीत बरोबर आणलेला आहेर अंगावरच्या उपरण्याच्या गाठीतून बाहेर काढला, तेव्हा ते दुसरच कोणाचं तरी लग्न असल्याचं लक्षात आलं तशी त्याचं तोंड अगदी पहाण्यासारखं झालं!.... ताड् ताड् आपल्या व माझ्याही थोबाडीत मारून तो जो त्या मांडवातून बाहेर पडला, तो थेट मला घेऊन बागणीला येऊनच उभा राहिला! .... पुन्हा म्हणून त्यानं कुणाच्या लग्नाचं नाव काढलं नाही की आमच्या घरातल्या लहान पोराथोराचं थट्टेनही कुणी लग्न करायचं म्हटलं तरी त्यानं साफ नकार देऊन म्हटलं, "नीट पत्त्या लागल्याव बगायला यील!....तंवर थंड पाण्यावानी गप गार बसा!!"

कारभाऱ्याचा स्वभाव असा मोठा स्वाभिमानी. एकदा बेत केला की पक्काच. पुन्हा म्हणून त्यात बदल नाही. म्हणून आमचे आजोबा थट्टेनं त्याला म्हणत, "कारभाच्याऱ्या मनाइरुद त्येला

देवानं न्ह्याचं म्हटलं तरी बी त्यो म्हनल अजून माजा ब्योत ठरला न्हाई तंवर आल्यापावली मागं फिर !... " त्यावर तोही आपल्या पडक्या दातांमधून बाहेर येणारी जीभ मोठ्या मुष्किलीनं आतल्या आत ठेवीत म्हणायचा, "अक्षी बराबर बोलला. माज्या बैलाचं खानंपिनं शेताची नांगरट–कुळवट, घरचं हायन्हवं बगीतल्या-बिगार देवाकडं जायाला परवानगी बो कुटली ?"

आणि तो असं म्हटला, की ते आम्हां पोरांनाही खरं वाटायचं. कारण कारभारी सकाळी उठला, की गोठा झाडून बैलांना हिरवी वैरण घालायचा, कडबा त्यांच्यापुढं सोडायचा आणि बादलीभर पाणी त्यांना दाखवून त्यांनी समाधानाची डिरकाळी फोडली, की मग तिथून बाजूला व्हायचा !... कधी कधी तो जेवायला बसला की पाटावरून उठायचा आणि पुढ्यातील भाकरी बैलांच्या तोंडात देऊन त्यांच्या गळ्याशी पडून मग आपलं जेवण घ्यायचा ! ...... एकदा तो आजारी पडला तर बैलांनी वैरणीला शिवलं नाही ! ! तो थोडा समोर आला नाही, की बिचारे डरकाळ्या फोडून सारं घर दणाणून टाकीत ! ... असं त्यांचं एकमेकांवर प्रेम, असा त्यांचा जगावेगळा परस्परांवर लोभ !...

म्हणून मी एक दिवस कारभाऱ्याला त्याच्या फेट्याचा शेमला त्याच्या डोक्यावरील फेट्याच्या पिळ्यांच्या वळचणीत कोंबीत विचारलं, " तुला बैल लई आवडतात की आमी मानसं ?"

त्यावर हातातील चिलीम दूर फेकून मला जवळ घेत व माझ्या तोंडावर आलेल्या केसांच्या बटा मागं सारीत तो एवढच म्हणाला, " शान्यावानी वागल त्यो मला आवाडतू ! खुळी पोरं न् खुळी बैलबी न्हाईती आवडत. तवा मी पाइजे असल तर शान्यावानी वाग. म्हनचील त्ये मग पायाशी आनून बतीन ! ...'

...आज या गोष्टीला फार दिवस झाले आहेत. पण अजून माझ्या मनात त्यातला ताजेपणा आहे. कारभारी आज आमच्या जवळ नाही. थकला म्हणून तो आपल्या घरी परगावी रहात असला, तरी मला त्याची उणीव अजूनही पदोपदी भासते आहे. वाटतं, माझी प्रत्येक गोष्ट त्याच्यामुळं अडते आहे. माझे कपडे, माझं खाणंपिणं, माझं आहे नाही ते सारं सारं त्यानं पाहावं असं अजूनही मला वाटतं !... मला ह्या गोष्टी येत असल्या तरी माझ्या लहान-पणी कारभाऱ्याच्या हातून त्या पार पाडल्या गेल्यामुळे, त्याचा हात या सर्वांवरून फिरल्याखेरीज त्या पार पडल्या आहेत, असं वाटत नाही. म्हणून मला नेहमी वाटतं की, कारभारी आज थकला असला तरी त्यानं आमच्या घरी असावं. त्याच्या मायेची सावली असल्याखेरीज आमच्या घरालाच काय पण आम्हांलाही खरा जिवंतपणा येणार नाही.

• • •

अनुक्रम ७३०५
3394
9/7/60

# ७. पावती

'न्हाई मजी तुमीच सांगा हे बरं का? उगा चार मानसात उठून नाव सांगा मजी? जावा तिकडं. सभेत उठून बोलनं आमाला दंडतंय का काय? हं! जावा!'

'वैन्स! गप बसा हं! अशानं कवा दिकुन येनार न्हाई सबेला. न्हवऱ्याचं नाव काय ठावं न्हाई तुमाला माज्या, तवा इचारतायसा? बगा मजी झालं....'

'न्हाई न्हाई! छाट्!! छाती दडपून पार जीव जाईल बगा मी हितं उठून बाप्या मानसांच्या म्होरं बोलले तर! गुमान जावा तुमचं तुमाला लखलाभ!!.... आमी आपली घरकामाची मानसं! शंभर भाकरी थापायला लावा, मग न्हाई म्हननारनीची जीब कापून घ्यावी खुशाल! खरं का खोटं जी?....'

'दिवानसाब! अशानं बगा हं!....लई खळीला येशीला तर जीव दीन बगा हिरीत उडी टाकून. न्हाई नाव घेणार जावा! त्या परास मी म्हनतो नरडीचा घोट घ्या, परवडंल मला ...'

'न्हाई न्हाई ! आमाला नावगावच न्हाई ते ! म्होरं व्हा बगू !...आमी आपल्या सांदीकोपऱ्यातच बेस हाऊत.'

माझ्याभोवती जमलेली गर्दी मागं हटवीत मी एकेका पावणीला सभेत उठून आपली ओळख करून देण्यासाठी व नावगाव सांगण्यासाठी विनंती केली. तशी एकेकजण माझ्यावर दातओठ खात अशी तुटून पडली ! त्यामुळं मी तर बाई खरंच सर्द झाले. आणिक त्यांचा एकेकीचा तो फणकारा बघून तर माझा जीव पार उडून गेला. मी करायला गेले काय न् झालं काय याचं गणितच मला मांडायला जमेना. म्हणताना मी बायकांचा नाद सोडला आणि परत आपल्या जागेवर येऊन बसले. म्हटलं आता आपणही ह्यांचं ऐकू नये. भाषण मुळीच करायचं नाही, की कुणाचं काय ऐकायचं पण नाही. म्हणून तोंडाला कुलूप लागावं तशी मी गप्प बसले. त्यासरशी माझ्या पुढ्यातील झाडांची सावली हलली आणि माझ्या समोरच्या बायका पण थोड्या गोऱ्यामोऱ्या होऊन नीटनेटक्या बसल्या.

तितक्यात माझ्या डाव्या हाताला कुणीतरी कुजबुजलं. 'अवो, पन तुमी बोला की! गानं म्हना. चट् कळी खुलल एकेकीची. हं ! करा सुरू.' तशी माझ्या पुढ्यात बसलेल्या एकदोघींनी होकार भरणारी मान हलवली. डोळे मिचकावले. पदर सावरला. उगीचच हसल्यागत केलं. त्यासरशी आम्ही बसलो होतो त्या पन्हाळगडावरील बागेतील झाडांनी पण माना डोलावल्या न् वाऱ्यानं आपलं अंग घुसळलं.

त्यामुळं मग मी माझा राग अंगावरून काढून त्या तिकडच्या सांदीकोपऱ्यात ढकलला. म्हटलं जाऊ दे उगीच रंगाचा बेरंग व्हायचा नाही तर काय ? ह्या बायकांच्यावर रागावून त्या थोड्या दबणार आहेत मला ? गोष्टच सोडून द्या. म्हणून मी माझीच समजूत काढली आणि लाऊडस्पीकर नीट पुढं ठेवून बोलू लागले. पहिल्यांदा कोल्हा-

पूरच्या आई जगदंबेला नमस्कार घातला. उगवतीकडच्या सूर्यनारायणाला सभेचं आवातनं दिलं. गणगोताला या म्हणाले...आणिक पंढरीच्या विठ्ठल-रुक्मिणीची गोष्ट सुरू केली. होता होता गीत बी म्हणाले...

पंढरीला जाया वाट कशी ती चांगली
शाडू नी मातीयींनी माजी पावलं रंगली



ह्या गोष्टीचा परिणाम झाला. बायकांचे चेहरे उमलले. पन्हाळगडावरच्या लालसर मातीने रंगलेल्या आपल्या पावलांची कुणी कुणी धूळ झटकली. समाधानाचा हुंकार भरला. अगदी मामानं बाळपणी आणलेली तेलंगसाडी नेसून बुरजावर मिरवावं तशा त्या हारखल्या म्हणीनासा! तर वो!

म्हणून मग मी मला पाहिजे होते ते बोलत बोलत गीतं म्हणायचा दणका लावला... आणिक सांगायचं म्हणजे दोनतीन म्हाताऱ्या बायका उजवीकडील त्या लांबच्या कोपऱ्यात आपला पदर दातात धरून बसल्यावत्या तर त्या चटकिनी अवचितच उठून माझ्याजवळ आल्या! ... मी गीत गात होते तर लाऊडस्पीकरपुढं आपलं तोंड करीत व मला मागं सारीत त्यांनी भराभर गीतं म्हणायला सुरुवात केली! मी मग हळूच मागं झाले. त्या बायकांच्या मुखांतून फुटणाऱ्या गीतांच्या गोण्या टिपीत राहिले...

त्या नादात मग किती वेळ गेला कुणाला माहीत. लाऊडस्पीकरचा आवाज एकाएकीच जरा भसाडा झाला तशी त्या दचकल्या. आणि मग कुणीतरी जोरानं चिमटा घ्यावा तशा मागं झाल्या. धूम पळत जात न् लाजत मुरकत 'काय बाई इप्रीत झालं!' या भावनेने आपल्या जागेवर जाऊन बसल्या.

त्या कारणानं उभ्या सभेला हसू फुटलं. पण मला आनंद झाला. मला पाहिजे ती पावती त्या बायकांनी या परीनं का होईना दिली याचाच मला आनंद झाला. म्हणून मी सभेला उद्देशून आता काही बोलणार तर तेवढ्यात शेजारच्या झाडाखाली नगारनौबत झडली. शिंग वाजलं, आणि नथी घालून नटलेल्या पाच सवाष्णी बायका सभेत आल्या. जशा काय इंद्राच्या दरबारातच पावण्या याव्यात तशा हं! ....म्हणून मग सभेला एकदमच कलाटणी मिळाली!! त्या

बायकांनी कुणी न सांगताच पंचारती केली. आरती बोलल्या आणि एकेकजण पुढे होऊन लाऊडस्पीकरच्या कानात बोलली कशी—

'आपुन सर्व्याजनी आला. लई संतोष झाला. आई आंबा-माता तुमचं भल करूं दे. नमस्कार करते. मानून घ्यावा. मी गोदूबाई पवारीन, कोलापुरी रंकाळ्यापाशी रहाते.'

'आता म्हनं लढाई चाललीया. देवा शंकूरबाच्या घरावर संकट आलंया. गांधीबाबाचं सवूराज धोक्यात आलंय म्हनत्यात. आपुन आपली इस्टेक मागितली तर दिऊन टाकू सरकारास्नी.'

'मी माजा तीन तोळ्यांचा गळ्यातला सर दिला कलेक्टरला. जवळचे शेपन्नास रुपय दिकून दिले आमच्या मालकांनी. आमचं पोरगं लढाईच्या तिकडं गेलंया. देव त्येला उदंड आऊक्ष देऊ दे.'

'आमानी शेतीचं सारं पाक कळतंया. आमी आमच्या शेताचं बघून घेऊ म्हणे. आमच्या मालकास्नी होमगार्डात मी जावा म्हटलं.'

'मला काय कळत न्हाई. मी हाय खुळी. साधीभोळी. पंढरीची गजनीची चोळी लेणारी. आळंदी देहू करणारी. पण आता आई भारतमातेची अब्रू चव्हाट्यावर आलीया तर ती राखीन म्हणते. मलाबी बंदूक चालवाया येतीय. ४२ च्या क्रांतीच्या वेळी शिकलीया मी. बोला भारतमाता की जय!'

या शेवटच्या बाईनं केलेल्या घोषणेला प्रचंड साद मिळाली. सभा दणाणून गेली. बायका उमेदीनं माझ्याकडे बघू लागल्या आणि त्यांच्यापैकीच ह्या बायकांचं बोलणं ऐकून मी तर थक्क होऊन गेले. मला पाहिजे होती ती पोचपावती त्यांनी दिली. या गोष्टीनं माझं मन समाधान पावलं. पण त्याहीपेक्षा त्या सभाधीट-

पणानं बोलू शकतात, या सत्यस्थितीनं माझ्या मनाला भारी उभारी आली.

म्हणून मी हात जोडून सर्वांना नमस्कार घालीत बोलले, 'आता तुम्हीच मला शिकवावं. तुम्ही शहाण्या आहा. वेळकाळ तुम्हांला समजतो. माझी खात्री आहे की, तुम्ही आता निवडणुका देखील सहज जिंकू शकाल....'

तितक्यात मला एकीनं खूण केली. थांबा म्हटलं. तशी मी थांबले न् उत्सुकतेनं तिच्याकडं पाहिलं. बघतेय तर एक गुटगुटीत अशी काळ्या रंगाची व मध्यम वयाची बाई माझ्यासमोर उभी राहिली. तिच्या कपाळावर, आखांवर, नाकावर आणि हनुवटीवर गोंदलेलं होतं आणि आपल्या डोईवरचा पदर पुढं ओढीत ती मला सांगत होती, 'ऐकावं. मी गाव पंचायतीत निवडून आलीया जी आमच्या ! ... '

आणि तिच्या या बोलण्याला साथ देत दुसरी तिच्या मागो-माग उठून म्हणत होती. 'मी पण निवडून आलूया जी! बाप्या माणूस उभा होता विरुद्. पण मी आलो निवडून. सारं गाव माज्या पाठीशी. तर वो! मी घरगुती औषधपाणी करतूंया न्हवं सव्यांस्नी? हं!....'

ते ऐकून माझा जीव एवढा झाला.... आणि मी अवाचितच बोलून गेले, 'आयाबायांनू, तुमी अमुक एक करावं म्हणून मी सांगायला आलेव्हते. पानवंतांच्या बायका तुम्ही. म्हणून पदरानं पालवीत तुम्हाला काही सांगणार होते. तर मी बोलायच्या आधीच तुम्ही त्या माझ्या कल्पनांची पोचपावती दिलीत. मी धन्य झाले....'

तशी मग एकजण पुढं येऊन माझ्या गळ्याला मिठी मारीत भरल्या मनानं बोलली, 'अक्कासाव, तुमच्या शब्दाला मान द्यावा

म्हन ढीग वाटतंया जी! पर मन भेतया न्हवं चार मानसात बोलायला! छाती दडपून जातीया मानसं बगीतली की! कत्रा सत्रच न्हाई तर जमावं कसं मी म्हणतो.... न्हवं, तुमीच सांगा जी!!'

त्यासरशी आमच्या दोघींच्याही भाव-भावनांना अशी वाचा फुटली की, त्यांचं वर्णन करायला कोणत्या शब्दांचा पाड लागावा?....छे, कुणालाच जमायचं नाही ते! आणिक न बोलताच डोळ्यांतील गंगा-यमुनांच्या संगमानं ते साईन संगीत सांगून टाकल्यावर दुसऱ्या कशा एकाची गरजच हो काय मी म्हणते?.... नाही का?....

• • •

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
दा. क्र. 11668 नों. दि
वि. 

अनुक्रम 83068
कादंबरी
3314
नों. दि. 9/1/80
वाचनालय शाखा.

IRBK-0111778